# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - स्वरसंपदा
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. मानसी निरंजन घाटे

नादातूनी नाद निर्मीतो ,
तालांतूनी स्वर निनादतो,
अवकाशातूनी अलवार,
अंतरंगी स्वच्छंद विहरतो !

शुध्द कोमल भाव तयांचे,
कधी तीव्र स्वरूप तयाचे,
सप्तरंगी मृदू मुलायम,
सुस्वरूप अद्वैताचे !

ताल लयींचा साज मनोहर,
शब्दसुरांचा मनहर संगम,
स्वरसंपदा दिव्य अलौकीक,
भावविश्व नितांत सुंदर !

भावतरंग लहरती अलगद,
अंतरंगी पडसाद सुखावह ,
हृदयी जाणीवांचे स्पंदन,
तार छेडीती आर्त मनभावन !

गायन वादन नृत्यकला,
संगीताची परीभाषा,
पाझरतो नवरस जसा,
भावतो तो तसा तसा !

Anahat Music Therapy

# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

कधी आनंदा येई भरते,
कधी येती दुःखास ऊमाळे,
केवळ श्रवणांत रमतां
कळे महात्म्य कीती आगळे !

कीती कीती हि दिव्य प्रचिती,
सामावली नादब्रम्ही,
शब्दब्रम्हाची साथ लाभतां,
रंगूनी जावे निजानंदि !

भासे मज ही जिवन संगीनी,
संजीवनी जगण्या जिवनी,
निरामयता रूजविण्या भवसागरी,
संगीताची ही किमया सारी !

Anahat Music Therapy